वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि.१७ जानेवारी २०२६ पाने ४ किंमत ३

# सरकारी अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू

## बीड हादरलं, गाडीमध्ये सापडला कोयता, घातपाताचा संशय



बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातून पुन्हा एकदा एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. जीएसटी विभागातील अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. सोलापूर- धुळे महामार्गालगत एका कारमध्ये या अधिकाऱ्याचा मृतदेह आढळून आला आहे. मृतदेहासोबत कोयता देखील आढळून आल्यामुळे घातपाताचा संशय व्यक्त होत आहे. सचिन जाधवर असे या अधिकाऱ्याचे नाव आहे, सचिन जाधवर हे कालपासून बेपत्ता होते, त्यानंतर त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. सोलापूर- धुळे महामार्गालगत एका कारमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला, तसेच याच कारमध्ये एक कोयता देखील आढळून आल्यानं खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा बीड जिल्हा चर्चेत आला आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती बीड पोलिसांकडून देण्यात आली आहे. त्यांच्या मृत्यूचं कारण मात्र अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाहीये.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, बीड येथे राज्य कर अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. सचिन जाधवर असे या अधिकाऱ्याचे नाव असून ते कालपासून बेपत्ता होते. या संदर्भात त्यांच्या पत्नीने बीड मधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार देखील दिली होती. आज दुपारी सचिन जाधव यांची कार सोलापूर - धुळे महामार्गालगत आढळून आली, त्या ठिकाणी पोलिसांनी पाहणी केली असता सचिन जाधवर हे कारमध्ये मृत अवस्थेत आढळून आले, दरम्यान त्यांच्या कारमध्ये एक कोयता देखील आढळून आला आहे. दरम्यान सचिन जाधवर यांचा मृतदेह बीडच्या जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला असून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकणार आहे. या प्रकरणात अधिक तपास सुरू असल्याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# बीड शहरात रस्ते चांगले झाले पण त्याच्यावर मनमानी करत अनेकांनी गतीरोधक केले

## उपनगराध्यक्ष साहेब, तुमच्या गल्लीत कालच एकाचा जीव गेला, आता तरी त्या गतीरोधकाकडे लक्ष द्या

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

# ना पांढरे पट्टे, ना रिफ्लेक्टर, शहरातील रस्त्यांवरचे गतीरोधकच मृत्यूचे सापळे

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील अंतर्गत रस्त्यांवर अनधिकृत आणि नियमबाह्य पद्धतीने तयार करण्यात आलेले गतिरोधक आता वाहनधारकांच्या जीवावर उठले आहेत. परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी सौदागर सावंत यांचा मृत सौदागर गतिरोधकावर दुचाकी अपघातामुळे मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी बीड शहरातील स्वराज्यनगरमध्ये घडली. ना गतिरोधकांवर पांढरे पट्टे, ना रिफ्लेक्टर तसेच मनमानी उंचीचे गतिरोधक रचनेतील त्रुटींचा प्रश्न गंभीर झाला आहे.शहरातील बहुतांश अंतर्गत रस्त्यांवर स्थानिक नागरिकांनी किंवा प्रशासनाने मनमानी पद्धतीने गतिरोधक उभारले आहेत. या गतिरोधकांची उंची आणि रुंदी भारतीय रस्ते परिषदेच्या नियमावलीनुसार नाही. अनेक ठिकाणी हे गतिरोधक इतके उंच आहेत की दुचाकींची इंजिने त्यांना घासतात. रात्रीच्या वेळी या गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्यामुळे ते दिसून येत नाहीत. परिणामी अपघात वाढले आहेत.




## धुळे-सोलापुर महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर दुभाजक नसल्याने धोका

### शहरातील रस्त्यांवरील गतीरोधकांसाठी नियम असे

आकार तसेच उंची: गतिरोधकाची मध्यवर्ती उंची १० सेंटीमीटर (०.१ मीटर) असावी.
**रुंदी :** त्याची एकूण रुंदी ३.७ मीटर असावी.
**आकार:** गतिरोधकाचा आकार गोलाकार असावा, ज्याची त्रिज्या १७ मीटर असावी. यामुळे ताशी २५ कि.मी. वेगाने जाणारी वाहने धक्क्याशिवाय पार होऊ शकतात..
**रंग आणि दृश्यमानता: पट्टे :** गतिरोधकावर पर्यायी काळे आणि पांढरे पट्टे (झेब्रा मार्किंगप्रमाणे) असणे अनिवार्य आहे. प्रकाशमान रंग: रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसण्यासाठी ल्युमिनस किंवा परावर्तित रंगाचा वापर करावा.
**सूचना फलक: पूर्वसूचना:** गतिरोधकापासून साधारण ४० मीटर आधी 'गतिरोधक आहे' असा सावधगिरीचा फलक लावणे बंधनकारक आहे. रंबल स्ट्रिप्स: काही ठिकाणी मुख्य गतिरोधकापूर्वी ५० मीटर अंतरावर ५ मि.मी. उंचीच्या 'रंबल स्ट्रिप्स' इशारा म्हणून लावता येतात.

### मनमानी अडचण ठरू शकते, नागरीकांना विचारात घ्यावे

**प्रश्न**-अंतर्गत रस्त्यांवर गतिरोधक टाकण्याचे नियम काय आहेत ?
**उत्तर**- शहरी भागात शक्यतो आपण गतिरोधक टाकणे टाळतो. मागणी असेल, त्याच ठिकाणी ते आयआरसीच्या नियमांनुसार तयार केले जाते.
**प्रश्न**-अनेक रस्त्यांवर मोठी गतिरोधके आहेत, ज्यामुळे अपघात होत आहेत.
**उत्तर** -वर्ष २०१७-१८ दरम्यान नगरोत्थान योजनेतून काही रस्ते तयार झाले आहेत. त्यावरील गतिरोधके मोठी असू शकतात.
**प्रश्न**-परस्पर विरोधी गतीरोधके टाकता येतात का ?
**उत्तर**-रस्ता तयार करताना गरज असेल तरच तेथे गतिरोधक टाकले जातात. नागरिकांनी तशी कल्पना द्यावी. मनमानी अडचणीची ठरू शकते.

## दोन राजकीय मित्र वयाच्या ८० व्या वर्षी झाले नगरसेवक

# रशिद मामू औरंगाबादमधून निवडून आले तर बीडमधून मोईन मास्टर साहेब

### दोन मित्र निवडून आल्याने कार्यकर्त्यांमध्ये जोश मोठ्या उत्साहात केला विजयोत्सव साजरा

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- औरंगाबाद महापालिकेत गरम पाणी वॉर्डातून नगरसेवक आणि आरक्षणामुळे महापौरपदावर वर्णी लागलेले माजी महापौर अब्दुल रशीद खान उर्फ रशीद मामू यांची राज्यभर एकच चर्चा आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने रशीद मामूंना पक्षात प्रवेश दिल्यापासून सत्ताधाऱ्यांसह विरोधकांच्या तोंडी त्यांचे नाव आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर नेत्यांनी रशीद मामूंना तिकीट दिल्यावरून उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला होता. औरंगाबादचा प्रभाग क्रमांक ४ ब मधून त्यांना पक्षाने उमेदवारी दिली. त्यांची लढत एमआयएमचे खान अमीर

▶▶ पान २ वर

### दोन जुने मित्र पुन्हा झाले नगरसेवक

एकेकाळी राजकारणात मजबूत पकड असलेले आणि सतत निवडून येणाऱ्यांमधून नाव असणारे औरंगाबादमधून अब्दुल रशिद खान मामू व बीडमधून मोईन मास्टर. अब्दुल रशिद खान मामू हे नुकत्याच

▶▶ पान २ वर



## मालेगावात सत्ता स्थापनेचा मोठा ट्विस्ट!

# इस्लामिक पार्टी की एमआयएम ? शिंदे सेना कुणासोबत जाणार ?

मालेगाव , (दिव्य न्युज):- राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मालेगाव महानगरपालिकेची निवडणूक सर्वाधिक चर्चेत राहीली. काल जाहीर झालेल्या निकालानुसार इस्लामिक पार्टीने ३५ जागा निवडून आणल्या आहेत. समाजवादी पक्षासोबत आघाडी करून त्यांनी मिळून ४० उमेदवार निवडून आले आहे. एमआयएमने २१ जागा निवडून आणत आपला जलवा दाखवला आहे. तर दुसरीकडे शिवसेना (शिंदे गट) यांनी १८ जागा निवडून आणल्या आहेत. कॉंग्रेसला फक्त ३ जागांवर विजय मिळवता आला आहे. तर भाजपला फक्त २ जागांवर मजल मारता आली आहे.इस्लामिक पार्टी आणि एमआयएममध्ये मोठे मतभेद आहेत. आणि त्याचे पडसाद प्रचारामध्ये दिसून आले. एमआयएमचे प्रमुख ओवैसी यांनी इस्लामिक पार्टीचे प्रमुख आसिफ शेख यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका केली. त्याचा परिणाम आता सत्तास्थापनेवरही दिसून येणार आहे. सध्याचे चित्र पाहता एमआयएम आणि इस्लामिक पार्टी एकत्र सत्ता स्थापन करु शकत नाही. असं चित्र आहे. मालेगाव महापालिकेच्या एकूण ८४ जागांसाठी निवडणूक पार पडली. यामध्ये संपूर्ण बहुमत सिद्ध करण्यासाठी ४३ जागांची गरज आहे. सध्या इस्लामिक पार्टी आणि समाजवादी पक्षाचे मिळून ४० जागा निवडून आल्या आहेत. म्हणजेच बहुमतासाठी फक्त ३ जागांची गरज आहे.मालेगावचा राजकीय इतिहास पाहता इस्लामिक पार्टीचे आसिफ शेख आणि शिवसेना नेते मंत्री दादा भुसे यांचा बालेकिल्ला म्हणून मालेगावची ओळख आहे. इस्लामिक पार्टीचे आसिफ शेख दादा भुसे हे चांगले मित्रही आहेत.



# नगरसेवक शेख बिलालच्या पाठपुराव्याने डाक बंगल्याचे होणार लवकरच कायापालट

## बिलाल यांच्या पाठपुराव्यानंतर मुख्याधिकाऱ्याने केली डाक बंगल्याची पाहणी, लवकरच सर्व काम पुर्ण करण्याचे दिले आश्वासन

### अनेक गोरगरीबांच्या कार्यक्रमांसाठी होता आधार मात्र जवळपास १० वर्षांपासून अडगळीत पडल्याचे चित्र

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील मध्यवर्ती ठिकाणी निजामकालीन डाक बंगला प्रसिद्ध असून, येथे अनेक गोरगरीबांच्या लेकरांची लग्न आणि विविध कार्यक्रम पार पडत होते. यासाठी नाममात्र शुल्क नगरपालिका आकारत होती. यामुळे हा डाक बंगला सर्वसामान्यांसाठी आधार ठरत होता. मात्र मागील जवळपास १० वर्षांपासून हा डाक बंगला मोडकळीस पडला असून, नगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याने नवनिर्वाचित नगरसेवक शेख बिलाल यांची मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे निवेदनाद्वारे या डाक बंगल्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती. या केलेल्या मागणीमुळे काल मुख्याधिकारी शैलेश फडसे व स्वच्छता निरिक्षक जाधव यांनी डाक बंगल्याची पाहणी केली. या वेळी नगरसेवक शेख बिलाल यांचीही उपस्थिती होती. या डाक बंगल्याची दयनिय अवस्था पाहून मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ या डाक बंगल्याची दुरूस्ती येणाऱ्या काही दिवसात पूर्ण करून देण्यात येईल व पुर्वीप्रमाणेच या ठिकाणी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन शेख बिलाल यांना दिले.

शहरातील किल्ला मैदान परिसरातील बलभीम कॉलेजच्या पाठीमागे डाक बंगला म्हणून प्रसिद्ध इमारत आहे. येथे या भागातील अनेक गोरगरिबांच्या मुला, मुलींचे लग्न, साखरपुडा इतर ही काही सामाजिक, सांस्कृतिक असे लहान मोठी कार्यक्रम होत असे, यासाठी सुरुवातीच्या काळात १५० रु. शुल्क आकारून वापरास दिली जात होती. यामुळे अनेक गोरगरिबांसाठी चांगली जागा नगरपालिकेमुळे मिळत असे. अनेक कार्यक्रमांची येथे रेलचेल असायची, पण ही इमारत पूर्वी निजामकालीन होती. ती मोडकळीस आल्याने ती पडून काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जुनी निजामकालीन इमारत पाडून नवीन आरसीसी इमारत बांधण्यात आली.या डाक बंगल्यामुळे शहरातील गोर गरीबांना याचा फायदा होत होता. नाममात्र शुल्कात या ठिकाणी लग्न समारंभ व इतर कार्यक्रम होत होते. पण नगर पालिकेकडून या डाक बंगल्याकडे दुर्लक्ष सुरू झाले आणि हळूहळू लोकांचेही या डाक बंगल्याकडे दुर्लक्ष होत गेले. मागील अनेक वर्षापासून या ठिकाणी कोणतेच कार्यक्रम होत नाही. कारण या डाक बंगल्यात कोणतीच सुख सुविधा राहिलेली नाही म्हणुन नवनिर्वाचित नगरसेवक शेख बिलाला यांनी हा डाक बंगला पुर्ववत सुरू करण्यात यावा आणि सर्व सोय सुविधा पहिल्याप्रमाणे उपलब्ध करून द्यावी ही मागणी करताच काल मुख्याधिकारी यांनी या बगल्याची पाहणी करत लवकरच सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील व डाक बंगल्याची दुरूस्ती ही करण्यात येईल असे आश्वासन दिले. शेख बिलाल यांच्या मागणी मुळे मोडकळीस आलेला डाक बंगला आता चकचकीत होणार असून याचा फायदा बीड शहरातील गोर गरीबांना होणार आहे.



# पराभवानंतर रोहित पवार यांचा खळबळजनक खुलासा

मुंबई , (दिव्य न्युज):- घवाल मध्ये निवडून आलेल्या शिवसेना नगरसेवकांची ठाण्यात बैठक सुरु आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,खसदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडत आहे. महापौर पदाच्या रणनीतीसाठी बैठक असल्याची सूत्रांची माहिती दिली आहे.जळगावात गणेश नगर येथे मारहाणीत जखमी झालेल्या तरुणाचा रक्तबंबाळ अवस्थेत पोलीस ठाण्यासमोर बसून ठिय्या आंदोलन करत गोंधळ सुरु आहे. सत्यजित गायकवाड असे जखमी तरुणाचे नाव असून धारधार शस्त्राने हल्ला केल्याचे सांगत हल्ला करणाऱ्यांना अटक करत कारवाईची मागणी केली जात आहे.

पुणे आणि पिंपरी महानगरपालिकेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्याचा निर्णय उशिरा झाल्याने आमची सत्ता आली नाही- रोहित पवार भारतीय जनता पार्टी हा शेवटच्या लेवलला जाऊन लढणारा पक्ष आहे स्थानिक पातळीवर त्यांनी आर्थिक आणि प्रशासनाची ताकद वापरून सत्ता मिळवली -रोहित पवार मुंबई महापौर आमचा व्हावा ही आजही आमची इच्छा आहे असे स्पष्ट शब्दात उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

नुकताच राज ठाकरे यांच्याबद्दल देवेंद्र फडणवीस बोलताना दिसले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्यासोबत जाऊन राज ठाकरे यांचा कोणताही फायदा झाला नाही पण राज ठाकरे एकत्र आल्याने उद्धव ठाकरेंना फायदा झाला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, पुण्याचा दादा पुण्याची जनता आहे. पुण्यात भाजपाला मोठे यश मिळाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी मोठे विधान केले. मला मुंबईकरांकडून नक्कीच जास्त अपेक्षा होती. कारण आम्ही गेल्या २५ वर्षांमध्ये मुंबईमध्ये खूप काम केली. मुंबईकर आम्हाला अधिक आर्शिवाद देतील, असे आम्हाला वाटले होते.मुंबईच्या महापौर पदाबद्दल बोलताना उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, मुंबईचा महापौर आमचा व्हावा, ही आजही आम्ही इच्छा आहे.

मुंबईकरांना वाटत नाही जर वाटत असतं तर मतदान केलं नसतं, मराठी आणि हिंदीत महापौर होणार मुंबईच्या विकासासाठी काम करूखरं आहे, शिंदेंच्या शिवसेनेला कमी धागा मिळाल्या ही वस्तुस्थिती, अनेकांनी ठाकरेंना झुकतं माप दिलं, मराठीच्या स्पिरीटचा शिंदेंना फटका बसलाशिंदे साहेब आत्मचिंतन , आत्मपरिक्षण करणारा नेता आहे, ते डगमगणारे नाहीत, त्यामुळे भविष्यात युतीत लढल्यानेच फायदा आहे महायुती अभेद्य ठेवली तर त्याचा परिपाक चांगला असेल सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली आहे. यावेळी दोघांनी महापालिका निवडणुकीच्या पराभवाबद्दल चर्चा केल्याचे सांगितले जात आहे. महापालिकेच्या विजयानंतर पुन्हा एकदा नितेश राणे यांनी ठाकरे बंधूना डिवचल आहे. महापालिकेवर सत्ता आल्यानंतर त्यांनी म्हटले की, मराठी माणूस एकवटला आहे.कल्याण, डोबिंवलीत आमचे उमेदवार पळवले, असा आरोप शर्मिला ठाकरे यांनी केला. यासोबतच त्यांनी म्हटले की, सत्ताधारी एकमेकांचे पैसे क पकडत होते.मुंबई महापालिकेत निवडून आलेल्या उमेदवारांचे औक्षण शर्मिला ठाकरे यांच्याकडून करण्यात आले. शिवतिर्थावर विजयी उमेदवारांना बोलावण्यात आले.ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला राज्यात ३० जागांवर विजय मिळाला असला तरी मुंबईत कॉंग्रेसबरोबर आघार्ड ४५ जागा लढवून एकही जागा मिळवता आली नाही. धक्कादायक म्हणजे मुंबईत ८ आंबेडकरी पक्ष महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात होते, मात्र यातील एकाही पक्षाला यावेळी एकही जागा जिंकता आली नाही.

# केज पोलिसांनी तिर्रट खेळणारे आठ जण पकडले

## तीन लाखाचा मुद्देमाल जप्त

केज, (दिव्य न्युज):- केज पोलिसांनी कानडी रस्त्यावरील एका धाब्याच्या आडुशाला तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या आठ जणांना छापा मारून रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडील एक लाख ८८ हजार रुपयांच्या चार दुचाकी, ८३ हजाराचे आठ मोबाईल, नगदी ४२ हजार ५६० रुपये असा तीन लाख तीन हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

केजहून कानडी रस्त्यावर असलेल्या स्मशानभूमीच्या बाजूला असलेल्या धाब्याच्या आडुशाला काही लोक तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याच्या गुप्त माहितीवरून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, फौजदार उमेश निकम, फौजदार अमिरोद्दीन इनामदार, जमादार महावीर सोनवणे यांच्या पथकाने १४ जानेवारी रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास छापा मारला. यावेळी विकास बब्रुवान वाघमारे, गणेश ज्योतीराम पवार, किरण अनिल बडे (तिघे रा. क्रांतीनगर, केज), अक्षय रामभाऊ चाटे (रा. तांबवा ता. केज), इसाक रज्जाक शेख, सद्दाम खाजा पठाण (दोघे रा. कोकचपीर, केज), रामकीसन रंगनाथ कदम (रा. विठ्ठलनगर, केज), महेश नंदकिशोर कदम (रा. वकिलवाडी, केज) या आठ जणांना तिर्रट नावाचा जुगार खेळताना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडील जुगाराचे साहित्य, एक लाख ८८ हजार रुपयांच्या चार दुचाकी, ८३ हजाराचे आठ मोबाईल, नगदी ४२ हजार ५६० रुपये असा तीन लाख तीन हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. फौजदार अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादीवरून विकास वाघमारे, गणेश पवार, किरण बडे, अक्षय चाटे, इसाक शेख, सद्दाम पठाण, रामकीसन कदम, महेश कदम या आठ जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पान ४ वरून

### मिल्लीया महाविद्यालयाच्या ......

वृक्षरोप वितरण करून, लागवड करावी व त्याचे संगोपन करावे असे सांगण्यात आले. कार्यक्रमास माजी ग्रामपंचायत सदस्य अनिस बेग, अप्पा शिंदे, समाजसेवक श्री.भारत दादा नेवडे, गावातील व परिसरातील नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलयास फाजील व उपप्राचार्य प्रोफेसर हुसैन एस.एस. यांचे मार्गदर्शन लाभले.

### लिंबागणेश पंचक्रोशीतील ......

अठरापगड जातीतील समाजबांधव मुंबईकडे रवाना होणार असल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. येळकोट येळकोट जय मल्हार, जय मल्हार बोलो, मुंबई चलो, दिपकभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है, आरक्षण आमच्या हक्काचं आहे, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आला. दिपकभाऊ बो-हाडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणाऱ्या धनगर समाजाच्या आरक्षणासाठीच्या न्याय मागणीला मराठा समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधवांचा जाहीर पाठिंबा असून, सर्व समाजबांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड तसेच नेकिनूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब मोरे पाटील, अनंतकाका मुळे, हरिओम क्षीरसागर, संदीप मुळे, शहादेव धलपे, गणपत तागड, रामदास मुळे, रामचंद्र मुळे,महावीर मुळे, संतोष वाणी, विनायक वाणी, संजय सुकाळे, प्रविण मुळे, जीवन मुळे, रोहन तागड, रामराजे मुळे, नवनाथ मुळे, केशव गिरे, कल्याण कोकाटे, दत्ता मुळे, आप्पा मुळे अमोल पितळे, बंडू ढगारे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सर सय्यद अहेमद खान ......

व पालकांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःचा व्यवसाय कसा करायचा याचा मुलाचे अनुभव त्यांना या कार्यक्रमात जाणवले .तसेच या आनंदनगरीमध्ये एकूण एक लाख ४० हजार रुपये पेक्षा जास्त रुपयांच्या उलाढाल झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.के. अहेमद शेख अफसर (जेष्ठ पत्रकार जिंतूर) होते. उदघाटक मोहसीन खान पठाण (उपाअध्यक्ष नगरपरिषद जिंतूर जिंतूर) यांनी केले. प्रमुख पाहुणे पत्रकार व इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते प्रतिनिधी उपस्थित होते.आनंद नगरीचा कार्यक्रम मौलाना हुसेन अहेमद मदनी फंक्शन हॉल ज़म ज़म कालोनी जिंतूर मध्ये होता. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व इत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### महादेव सावंत यांची ......

रहिवासी श्री. महादेव गणपतराव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महादेव सावंत हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व असून वंचित, गोरगरीब व निराधार जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.
अन्यायाविरोधात प्रसंगी शासनाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची भूमिका त्यांनी वेळोवेळी घेतली आहे. यापूर्वी त्यांनी भाजपमध्ये कार्यरत राहून पक्षवाढीसाठी तसेच जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले असून, या कार्यामुळे ते जनतेतील विश्वासार्ह नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत. त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य लक्षात घेऊन विकासाभिमुख नेतृत्व असलेले आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात महत्त्वाची जबाबदारी देत वडवणी तालुका उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी सावंत यांनी पक्षाची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे तसेच पक्षाची प्रतिष्ठा जपून जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अग्रक्रमाने काम करावे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. नियुक्तीपत्र प्रदान प्रसंगी जिल्हा परिषद माजी सभापती डॉ. दत्तात्रय दुधाणे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, राजेभाऊ लंगे, अंकुश नाईकवाडे, वैभव मस्के, राहुल चिंचकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महादेव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या माध्यमातून तालुक्यात पक्षसंघटन अधिक बळकट होईल तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूका मध्ये पक्षाला याचा नक्कीच फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

## रशिद मामू औरंगाबाद

अनवर यांच्याशी होती. पडेगाव भागातून १३०० हून अधिक मतांनी ते निवडून आले आहेत. मुस्लिम मतदारांची लक्षणीय संख्या असणाऱ्या या भागात ८४ वर्षांच्या रशीद मामुनी उद्धवसेनेची मशाल पेटती ठेवलीय.रशीद मामूंच्या उमेदवारीला शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचाही कडाडून विरोध होता. रशीद मामू यांना ठाकरे गटात प्रवेश देण्यात वरून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यात मतभेद झाले होते. रशीद मामूंच्या प्रचारासाठी जाणार नसल्याचेही खैरे यांनी सांगितलं होतं. रशीद मामूंच्या पक्षप्रवेशावर शिवसेनेतील अनेक बडे नेते नाराज असल्याचीही चर्चा होती. शिवसेनेत प्रवेश दिल्यानंतर ही रशीद मामू यांना मशाल चिन्हावर पडेगाव भागातून उमेदवारी देण्यात आली. प्रभाग ४ मधून त्यांनी विजय मिळवलाय. पक्षप्रवेशापासून उठलेली टीकेची झोड ते स्वकीयांची नाराजी ओढवत उद्धव ठाकरेंनी रशीद मामूंना महापालिकेचे तिकीट दिलं. सामाजिक धार्मिक समीकरणे जुळवताना रशीद मामू निवडून येतील का असे चर्चा सुरू झाल्या होत्या. नाराजी ओढवून का होईना ठाकरेंचे 'रशीद मामू' जिंकल्यामुळे शिवसेनेचा जीव भांड्यात पडल्याचं बोललं जातंय.

औरंगाबादमहापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाने ९४ जागांवर उमेदवार दिले होते. मात्र शिवसेना ठाकरे गटाला दोन आकडी विजयही मिळवता आलेला नाही. ठाकरे गटाला औरंगाबादमध्ये केवळ सहा जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे शिवसेना नेते अंबादास दानवे यांनाही भावाच्या पराभवामुळे फटका बसल्याचा दिसून आलं. एकीकडे बालेकिल्ला असलेल्या शिवसेनेला औरंगाबादमध्ये त्यांचा गड राखता आला नाही. दुसरीकडे शिंदे गटाला ही औरंगाबादमध्ये १३ जागाच मिळाल्या असून भाजपने बहुमताचा आकडा गाठल्याचा चित्र आहे.

## दोन जुने मित्र पुन्हा

झालेल्या निवडणूकीत उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून निवडून आले आहेत. तर मास्टर साहेब हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून निवडून आले आहेत. मास्टर साहेब आणि रशिद मामू हे जुने मित्र असून दोन्ही मिसा अंतर्गत जेलमध्ये सोबतच होते. मागील अनेक दशकापासून हे मित्रत्वाची जोडी पुन्हा वयाच्या ८० व्या वर्षी नगरसेवक म्हणून निवडून आल्याने कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा तोच जोश आणि जल्लोष दिसून आला. एकेकाळी औरंगाबादमध्ये रशिद मामू यांची मोठी पकड होती ते सतत अनेक प्रभागातून नगरसेवक म्हणून निवडून येत होते. रशिद मामू हे औरंगाबाद महानगर पालिकेचे महापौर ही राहिलेले आहेत तसेच मोईन मास्टर साहेब हे बीड शहरातील विविध वार्डामधून नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत. मास्टर साहेब ही बीड नगर पालिकेत अनेक विषयाचे सभापती व उपनगराध्यक्ष ही राहिलेले आहेत. पुन्हा या जोडीने विजय प्राप्त केल्याने अनेक जुन्या मित्रांनी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या आहेत.